# प्रेसनोट

दि.०३/०४/२०२५

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहिल्यानगर |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | कोतवाली पो.स्टे., जि.अहिल्यानगर गुरनं.३०६/२०२५ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७(अ) |
| आरोपीचे नांव व कार्यालय | आरोपी (खाजगी इसम) मकरंद गोरखनाथ हिंगे, वय–४० वर्ष, धंदा–शेती, रा.वाळुंज, ता.जि.अहिल्यानगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | १,००,०००/– रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती ४५,०००/– रुपये स्वीकारण्याचे मान्य करुन पहिला हप्ता म्हणुन २५,०००/– रुपये स्वीकारण्याची तयारी दर्शविली. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | २५,०००/– रूपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार हे सहकारी संस्थेचे सभासद असून ठेकेदारीचा व्यवसाय करीत आहेत. त्यांना वाळुंज ग्रामपंचायतच्या हददीत पेव्हर ब्लॉक बसवण्याचे टेंडर बांधकाम विभागाकडून सहा महिन्यापूर्वी मंजुर झाले होते. सदरचे काम पूर्ण झाल्यानंतर त्यांना दहा लाखाचे बील शासनामार्फत मंजुर झाले होते. सदर कामाच्या पूर्णत्वाचा दाखला वाळुंज ग्रामपंचायत सरपंच यांच्याकडुन तक्रारदार यांना हवा होता. तो दाखला देण्याच्या मोबदल्यात सरपंच यांचा मुलगा मकरंद हिंगे यांनी सरपंचांची सही घेऊन देण्याकरीता सरपंच यांच्यासाठी तक्रारदार यांच्याकडे १,००,०००/– रुपये लाचेची मागणी केले बाबतची तक्रार दि.०२/०४/२०२५ रोजी ला.प्र.वि. अहिल्यानगर येथे प्राप्त झाली होती.<br>सदर लाच मागणी तक्रारीच्या अनुषंगाने दि.०२/०४/२०२५ रोजी लाच मागणी पडताळणी करण्यात आली. लाच मागणी पडताळणी दरम्यान आरोपी (खाजगी इसम) मकरंद गोरखनाथ हिंगे यांनी पंचा समक्ष तक्रारदार यांचेकडे १,००,०००/– रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती ४५,०००/– रुपये स्वीकारण्याचे मान्य करुन पहिला हप्ता म्हणुन २५,०००/– रुपये स्वीकारण्याची तयारी दर्शविल्याचे निष्पन्न झाले. दि.०२/०४/२०२५ रोजी अहिल्यानगर शहरातील बुरुडगांव रोड, अहिंसा चौक येथे आयोजित सापळा कारवाई दरम्यान आरोपी मकरंद हिंगे यांनी तक्रारदार यांचेकडुन पंचा समक्ष २५,०००/– रुपयांची लाच स्वीकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंब्रंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहिल्यानगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक :– ९९३०९९७७००

(अजित त्रिपुटे)
पोलीस उप अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, अहिल्यानगर